क्रमांक:एसटीएम-०२१५/सीआर-४८/२०१६/तीन                                                 दिनांक:१० ऑक्टोबर, २०१६

# घोषणा

**विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षा - २०१५ अर्ज सादर करण्याबाबत**

जाहिरात क्रमांक ४/२०१६, २२ जानेवारी, २०१६ नुसार आयोगामार्फत दिनांक १९ जून, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या विक्रीकर निरीक्षक पूर्व परीक्षा - २०१५ चा निकाल दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात आले आहे.

**२.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६** या कालावधीतच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची अथवा परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

सु.ह. अवताडे
अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई

ठिकाण: मुंबई